महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७० वा | दिनांक : २४/०८/२०२५ | वार : रविवार

## माझ्या पांडुरंगाला मी मटण खाल्लेले चालते - सुप्रिया सुळे



**नाशिक :** मी मटण खाल्लेले माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय अडचण? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला आहे. आम्ही आमच्या पैशांनी खातो. आपण कुणाला मिंधे नाहीत, असेही त्यांनी म्हटले. तसेच, त्यांनी महायुती सरकारवरही अनेक मुद्द्यांवरून टीका केली. त्या दिंडोरी येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात बोलत होत्या.

दिंडोरी तालुक्यातील खेडगाव येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला मंत्री नरहरी झिरवळ आणि सुप्रिया सुळे यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमात भाषण दरम्यान मंत्री नरहरी झिरवळ यांच्यां समोरच सुप्रिया सुळे यांची सरकारवर सडकून टीका केली.

मी रामकृष्ण हरी वाली आहे. फक्त माळ घालत नाही. कारण कधी कधी मटण खाते, खरे बोलते. मी काही त्यांच्यासारखे खोटे बोलत नाही. माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला. आमचे आई-वडील खातात, सासू-सासरे खातात, नवरा खातो, असेही त्या म्हणाल्या. आम्ही आमच्या पैशांनी खातो. दुसऱ्यांचे आपल्याकडे उधार नाही. आपण कुणाला मिंधे नाहीत. एकदा कुठेतरी जेवायला गेले असता, तिथे मटण खाल्ले होते. तेवढेच व्हायरल केले. खाल्ले तर काही पाप केले का? खायचा मोह होतो म्हणून अजून माळ घातली नाही. जे करायचे डंके की चोट पे, दिल खोल के करो, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी सरकारच्या कारभारावर टीका केली. "मुख्यमंत्री तर मला वेळच देत नाही, असा आरोप सुळे यांनी केला. मुख्यमंत्री वेळ देत नसल्याने मी मागणेच बंद केले आहे. दहा वेळा आपण वेळ मागतो, पण वेळ देत नाहीत. याचा अर्थ काय, त्यांना वेळ द्यायचा नाही. म्हणून आम्ही थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतो. मी ठरवले आहे, इथे काम करत नाही ना, माझी कामे दिल्लीत होतात" असे सांगत त्यांनी अमित शहा यांचे जाहीर आभारही मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, मात्र ते पूर्ण केले नाही, असेही त्यांनी म्हटले.

सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला. "या योजनेतून २५ लाख महिलांची नावे कमी करण्यात आली आहेत. माझी सगळ्यांना विनंती आहे, झिरवाळ साहेब आपण ताकदीने याचा विरोध करायला हवा. ४ हजार ८०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. हजारो पुरुषांनी एवढे फॉर्म भरले कसे?" असा सवालही सुळे यांनी केला. लाडक्या बहीण योजनेची संपूर्ण चौकशी करणार असल्याचेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

माणिकराव कोकाटेंवरही साधला निशाणा

सुप्रिया सुळे यांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर देखील टीका केली. पत्ते तुम्ही खेळायचे आणि कोर्टात चकरा आम्ही मारायच्या का? तुमची आब्रु तुमच्याच मागच्या माणसाने घालवली. व्हिडीओ कोणी काढला? असा सवालही सुप्रिया सुळे यांनी केला. रोहित पवार यांना सारख्या नोटीस येतात. पण आमचा रोहित घाबरत नाही, असेही त्या म्हणाल्या.

## मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलंय मग कशासाठी आग्रह? - छगन भुजबळ



**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली असून, येत्या २९ ऑगस्ट रोजी मराठा मोर्चा मुंबईत धडकणार आहे. यावर ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिल्यानंतरही हे आंदोलन कशासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्याची जय्यत तयारी मराठा आंदोलकांकडून केली जात आहे. मराठा आरक्षणासाठी निघणारा हा मोर्चा पहिल्या मोर्चांपेक्षा पाच पट मोठा असेल, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगे आपल्या मोर्चावर ठाम असून, छगन भुजबळ यावर प्रतिक्रिया दिली आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्याची त्यांची मागणी होती, ती पूर्ण केलेली आहे. मराठा समाजाला दहा टक्क आरक्षण देण्यात आले आहे. मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण आम्ही टिकवणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे. त्यामुळे तो प्रश्न संपलेला आहे. मग हा आग्रह कशासाठी? हे कळण्याच्या पलिकडचे आहे, अशी टीका छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंवर केली. भुजबळांनी मोर्चाच्या वेळेबाबतही नाराजी व्यक्त केली. पावसामध्ये, गणपती उत्सवामध्ये हे काय करणार आहे? मला काही कळत नाही. लोकांना का त्रास देतायेत? असा सवाल छगन भुजबळ यांनी उपस्थित केला. त्यांचे जर हेच म्हणणे असेल की, ओबीसीमधून आरक्षण पाहिजे, तर चार आयोगांनी आरक्षण नाकारलेले आहे. सुप्रीम कोर्टानेही फार मोठा जजमेंट दिलेले आहे, असेही भुजबळ यांनी म्हटले आहे.

छगन भुजबळ पुढे म्हणाले, बाकीच्या काही गोष्टी आहे. सारथी, बार्टी, महाज्योती या सारख्या संस्था आहेत. त्यावर आपण विचार केला पाहिजे. सारथीच्या माध्यमातून मिळणाऱ्या गोष्टींपैकी अनेक गोष्टी महाज्योतीच्या वाट्याला आलेल्या नाहीत. म्हणून मी मंत्रिमंडळात नेहमी सांगत असतो, ओबीसीची संख्या मोठी आहे, त्यांना किमान समान वागणूक द्या.

पैसे कोण देते? हे विद्यार्थ्यांना कळत नाही. आदिवासी आणि दलित समाजाला दिल्लीतून पैसे येतात. विद्यार्थ्यांना एवढेच माहिती असते की, सरकार पैसे देते, मात्र आम्ही या गोष्टी विद्यार्थ्यांना नाही सांगू शकत. मग त्यांच्या मनात असा प्रश्न निर्माण होतो, त्याला देतात मग मला का देत नाही. मुख्य सचिवांनी याच्यात लक्ष देऊन सर्वांना समान वागणूक कशी मिळेल ते बघावे असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. चांगले काम चाललेले आहे. मराठी विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न सोडवले गेले आहेत, असेही छगन भुजबळ म्हणालेत.

## छत्रपती संभाजीनगरमधील हत्याकांडाचा : बाप म्हणाला जिवंत सोडू नका, आईने हातात चाकू दिला; मुलांनी केले सपासप वार

**छत्रपती संभाजीनगर :** एकाच गल्लीमध्ये राहणाऱ्या दोन कुटुंबांमध्ये प्लॉटवर असलेल्या खडीवरून वाद झाला. निमोने कुटुंबातील 6 जणांनी समोरच राहणाऱ्या पाडसवान कुटुंबावर हल्ला करून चौघांना गंभीर जखमी करून एकाचा खून केला. ही घटना एन-6 मधील संभाजी कॉलनीमध्ये दुपारी घडली. यात पाडसवान कुटुंबातील प्रमोद रमेश पाडसवान (38) यांचा दुर्दैवी अंत झाला, तर त्यांचे वडील रमेश जगन्नाथ पाडसवान (60) आणि प्रमोद यांचा मुलगा रुद्राक्ष पाडसवान (17) गंभीर जखमी झाले. आई मंदाबाई यांनाही मारहाण करण्यात आली. विशेष म्हणजे आरोपी ज्ञानेश्वरने ज्या ठिकाणी गेल्या महिन्यात वाढदिवस साजरा केला, त्याच ठिकाणी शुक्रवारी खून केला. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला आहे.

याप्रकरणी ज्ञानेश्वर काशीनाथ निमोने, गौरव काशीनाथ निमोने, सौरव काशीनाथ निमोने, काशीनाथ येडू निमोने, शशिकला काशीनाथ निमोने व जावई मनोज दानवेसह अन्य आरोपींवर सिडको ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती निरीक्षक कुंदन वाघमारे यांनी दिली. यातील ज्ञानेश्वर, काशीनाथ, मनोज, सौरव, गौरव या आरोपींना ताब्यात घेतले असून अन्य आरोपींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पाडसवान यांच्या घराच्या समोरच सिडकोचा ऑड साइजचा प्लॉट आहे. तो काही वर्षांपूर्वी त्यांनी विकत घेतला. मात्र त्याच ठिकाणी निमोने गणपती मंडळ अध्यक्ष असून त्यांचा एका राजकीय पक्षाशीदेखील संबंध असल्याने सातत्याने त्यांचा कॉलनीमध्ये वाद सुरू असायचा. याच गणेश मंडळाचा उत्सव पाडसवान यांच्या प्लॉटवर साजरा करण्यात येतो. मात्र आता पाडसवान यांना त्या ठिकाणी बांधकाम करायचे असल्याने निमोने त्यात नेहमी खोडा घालायचा. त्याने त्याच जागेवर मंडळाचे ढोल ठेवण्यासाठी शेड टाकले होते.

सिडकोकडे अतिक्रमणाची रीतसर तक्रार केल्यावर एप्रिल महिन्यात त्यांनी हे अतिक्रमण हटवले होते. त्यानंतर 15 ते 20 दिवसांपूर्वी त्याने पुन्हा त्याच ठिकाणी ढोल आणून ठेवले. त्यातून दोन्ही कुटुंबांत वाद झाला होता. त्यानंतर गणेशोत्सव जवळ येत असल्याने त्यांच्यातील वाद वाढत होता. बांधकामासाठी आणलेले साहित्य त्या ठिकाणी पडलेले होते. ते बाजूला करून घ्या आम्हाला तिथे कार्यक्रम करायचा असे म्हणून निमोने त्यांच्यावर दबाव टाकायचे. त्यातूनच हा वाद विकोपाला जाऊन हल्ला झाला.

किराणा व्यावसायिक असलेल्या पाडसवान कुटुंबीयांवर निमोने कुटुंबीयांनी हल्ला केला. निमोने यांची तिन्ही मुले, जावई दानवे याने प्रमोद यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे प्रमोद खाली पडल्यावर ज्ञानेश्वरने चाकूने त्यांच्या पाठीत चाकूने खुपसला. घाबरलेले रमेश पळून जात असताना सौरव, मनोज आणि काशीनाथ यांनी 'याला आज जिवंत सोडायचे नाही, याचा खेळ संपवून टाकू' असे म्हणून त्यांना मारहाण केली, तर आरोपी शशिकला हिने तिच्या हातातील चाकू सौरभच्या हातात दिला. रमेश यांना काही कळायच्या आतच त्याने त्यांच्या पोटात खुपसला.या वेळी रमेश यांचा नातू रुद्राक्ष मदतीसाठी आला. आरोपींनी 'यालाही सोडू नका' असे म्हटले. त्यानंतर आरोपीने रुद्राक्षवरही चाकूने वार केला.

आरोपी निमोने कुटुंबीयांनी पाडसवान कुटुंबीयांवर एवढ्या क्रूरतेने हल्ला केला की एन-6 मधील संभाजी कॉलनीतील नागरिक स्तब्ध झाले होते. दरम्यान, घटनेत प्रमोद यांचा मृत्यू झाला. त्यांचा मुलगा रुद्राक्ष आणि वडील रमेश गंभीर जखमी झाले, तर आई मंदाबाई यांना मार लागला आहे. प्रमोद यांचा मृत्यू झाल्याची माहिती फक्त त्यांचा मुलगा रुद्राक्षलाच आहे. त्याने पोलिसांना 'मला बाबांना शेवटचे बघू द्या' अशी विनवणी केली. या वेळी पोलिसांचेही डोळे पाणावले. त्यांनी रुद्राक्षला घाटी रुग्णालयात घेऊन जात मृत वडिलांचे अंतिम दर्शन घडवले. या वेळी रुद्राक्षने हंबरडा फोडला होता. मात्र, आपला मुलगा प्रमोदचा मृत्यू झाला याची रात्री उशिरापर्यंत वडील रमेश पाडसवान आणि आई मंदाबाई पाडसवान यांना कल्पनाही नव्हती. मुलाच्या मृत्यूची माहिती दिली तर रक्तदाबाचे रुग्ण असलेले रमेश यांची प्रकृती खालावण्याची भीती असल्याने नातेवाइकांनी माहिती देण्याचे टाळले.

# महाराष्ट्र जनशक्ति

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ ऑगस्ट २०२५


# श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**उमरगा :** (ता. २३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि साहित्यिक अभिव्यक्तीला एक सुंदर व्यासपीठ मिळाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 67 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात प्राचार्य डॉ . संजय अस्वले यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली. काव्यवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपापल्या रचनांमधून जीवनाचे विविध पैलू, सामाजिक प्रश्न, निसर्गाची अनुभूती आणि तरुणाईची स्वप्ने यांना शब्दरूप दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी मार्गदर्शन करताना विद्यापीठाच्या 67 वर्षातील उच्च शिक्षणातील प्रगतीचा आलेख मांडत कवितेचे सामाजिक परिवर्तनातील स्थान अधोरेखित केले. "कविता ही विचार आणि भावनांचे शस्त्र असून तिच्यामध्ये संवेदना जागृत करण्याची विलक्षण ताकद असते," असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करताना काव्यलेखन व वाचनकलेमुळे निर्माण होणाऱ्या आत्मविश्वासाचे महत्त्व स्पष्ट केले.यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी .एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी यांची प्रमुख उपस्थिती होती. काव्यवाचन स्पर्धेत एकूण 26 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे सातशे एक रुपयाचे प्रथम पारितोषिक प्रज्वल चव्हाण यांना मिळाले. द्वितीय पारितोषिक सिद्धिविनायक शिंदे, तृतीय पारितोषिक गणेश मोरे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक सातुरे करीना यांना मिळाले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देवून प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाङ्मय मंडळाचे प्रमुख डॉ. सन्मुख मच्छटे यांनी केले. याप्रसंगी प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले, प्रा. एम. डी. साळुंके, डॉ. सुभाष इंगळे, परीक्षक डॉ. डी. एस. चिटमपल्ले, डॉ . प्रवीण गायकवाड, प्रा. ज्योती जोडदापके, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बीना लोकरे यांनी तर आभार डॉ. सुभाष इंगळे यांनी मानले.

# बनवाबनवी

आता कुणीच कुणाचे
राहिलेले दिसत नाही
सत्ता,संपत्ती अन् मोबाईलने
माणसाला माणसात ठेवले नाही

प्रेम, जिव्हाळा,आदर
आत्ता कुठे दिसत नाही
नात्यामधला आपलेपणाही
पूर्वीसारखा राहिला नाही

बोलतात सारे गोड गोड इथे
साखरसुद्धा त्यापुढे फिकी
काम कोणाचेच इथे होत नाही
सारे विषमतेने बरबटलेले

अनेकजण या व्यवस्थेला कंटाळून
लढण्याऐवजी मरणे पसंत करतात
सरकारी सा-या यंत्रणा फेल ठरताहेत
कुणाकडून न्याय मिळणार ?

देव, धर्म तर सारेच करतात
तरीही एकमेकांशी द्वेषाने वागतात
खानाखराबा कुणाचाच होत नाही
सारेच जातीयवादी वागतात

लोक काड्या करतात
कामं करत नाहीत
कुणाचे चांगले करण्याऐवजी
कुणालाही आडवे येणे पसंत करतात

जो तो माणूस
माणसाकडे शंकेने पाहतो आहे
विश्वास कोणावर राहिला नाही
जिकडे तिकडे बनवाबनवी


**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
**पिंपळनेर ( धुळे )**
**मो.** 9423397484



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# माळीवाडा येथे लक्ष्मीमाताची यात्रा




**दौलताबाद (जावेद अहमद) :** पोळाच्या दुसऱ्या दिवशी पाडव्याला निमित्त माता लक्ष्मीआईची नवसाच्या बारा गाड्या यात्रा भरते आईचे भक्त गळ टोचून नवस फेडतात.हि परपंरा १५० वर्षा पासून चालू आहे. सकाळपासुन भक्त नवस फेडण्याठी रागेत उभे राहातात शनिवारी सकाळी ११ वाजता माता लक्ष्मीमाताची पुजा करुन बारा गाड्याकडे भक्त गावातील बाहेरील येशीत येथे.भगवान मारुतीचे पुजन लक्ष्मीमाताची पुजाकरुन बारा गाड्याची पुजा करुन नवशाचा गळानी बारा गाड्याची सुरूवात झाली. यावेळीपंचक्रुशीत महिला, मुले मोठ्या संख्येने गरदी होती.३००ते ४०० भाविकानी गळ ओढतात. गळाची सुरवात नवसाच्या गळ्याने सुरवात होते.आईची अशी आखाई का सांगितले जाती की माता आपल्या भक्ताचे नवस पुर्ण करते.मंदिरावर विद्युत रोषनाई केली.जत्रा मध्ये मोठ्या प्रमाणात राहाट पाळने, जंपीग जपाक, खेळनीची दुकाने थाटली जाते.यावेळी गावातील प्रत्येकाच्या घरोघरी गोडधोड पदार्थ केले जाते.या साठी सुभाष मुळे,बाबाजी मुळे,कडू कीर्तिकर, मनिष गाजरे,धमपाल गायकवाड, प्रवीण बर्डे,कृष्णा मुळे, दत्तु मुळे, गोरख हेकडे,संजय वावरे,शिवाजी मुळे, किशोर मुळे, धनराज शेरकर ,शिवा धनायत ,अशोक साठे,वैजिनाथ हेकडे, सचिन देवतकर सुनिल मुळे,गंगाधर मुळे, संजय आस्वार, रंजित आस्वार गणेश आस्वार या यत्रेसाठी यानी मोठे योगदान असते समस्थ गावकरी या यात्रासाठी मेहनत घेतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ ऑगस्ट २०२५


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा चिकलठाणा येथे गणपती बनवण्याची कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** २३ ऑगस्ट २०२५ रोजी आगामी गणेशोत्सवासाठी शाळेत शाडू मातीपासून गणपती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली यात विद्यार्थ्यांनी नवनवीन गणपतीचे रूपे साकार केली. यात विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक गणपती कसा बनवणे याचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या गणपती बाप्पाची मूर्ती विविध रंगछटांमध्ये सजवली तसेच यावर्षी इको फ्रेंडली गणेश उत्सव साजरा करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. नवनिर्मितीचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून ओ संडत होता या कार्यशाळेच्या नियोजनासाठी शाळेतील मुख्याध्यापक श्री पी पी शिंदे सर आणि शाळेतील शिक्षक कर्मचारी, कला निदेशक आणि सेवक वर्ग यांनी परिश्रम घेतले

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहण झाले. यावेळी विद्यापीठ गीताची ध्वनीमुद्रिका वाजविण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भिकूलाल सले यांनी केले.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन साजरा



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी स्थित श्रीकृष्ण महाविद्यालयात श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री प्रभाकर तात्या हिरवे,संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विभावरीताई शाईवाले,सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.आर.एन.निगडे,संस्थेच्या सर्व शाखांचे विभागप्रमुख ,महाविद्यालय विकास समितीचे सर्व पदाधिकारी, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिन विद्यापीठ ध्वजाच्या ध्वजारोहनाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक करताना डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी सांगितले की, २३ऑगस्ट १९५८ साली विद्यापीठाची स्थापना झाली असून ,विद्यापीठाच्या स्थापनेनंतर मराठवाड्यात सर्वदूर शैक्षणिक क्रांती घडून आली.त्यापूर्वी मराठवाड्यात सर्वच क्षेत्रात मागासलेपणा होता,शैक्षणिक मागासलेपण असल्यामुळे मराठवाड्याला शैक्षणिक चेहराच नव्हता.पण विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सर्वच स्तरातील ,समाजातील पहिली पिढी उच्चशिक्षित झाली आणि त्यांच्या एकूणच कुटुंबात आणि मराठवाड्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला.त्यानंतर नामविस्ताराचा लढा यशस्वी होऊन चौदा जानेवारी १९९४ साली विद्यापीठाचे नामांतर झाले.आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या यशस्वी घोडदौडीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला.नवीन विभाग निर्माण झाले ,नवीन सुधारणा झाल्या,भरपूर निधी मिळाला.एकूणच विद्यापीठाचा कायापालट होऊन गुणवत्ता वाढीस चालना मिळाली.विद्यापीठाचे रूपच पालटून गेले.आजघडीला चार जिल्ह्यात ४५० महाविद्यालये कार्यरत असून ४५०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.नुकतेच २०२४_२०२५ NIRF म्हणजेच नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर्क यांच्या वतीने रँकिंग प्रसिद्ध झाले असून आपल्या विद्यापीठाला त्यात ३७ वा क्रमांक प्राप्त झाला आहे.ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.आज विद्यापीठ स्थापनेला ६७ वर्ष पूर्ण होत असून या सबंध प्रवासात विद्यापीठाने सर्वच क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे.यापुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिकाधिक प्रगती करून आपली यशस्विता आणखी वाढवेल यात मला तिळमात्र शंका वाटत नाही.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## घर फोडून चोरट्यांनी वीस हजार रुपये पळविले

**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद खुलताबाद रस्त्यावर दिल्ली दरवाजा जवळ असलेल्या इमादोदिन दर्ग्याचे खादीम जमिल शॉह यांचे घर आहे त्या ठिकाणी चहाची टपरी चालवून आपल उदरनिर्वाह करतात दि 22 रोजी रात्री एक वाजेच्या सुमारास जमिल शाह च्या बहिणी चे दुखत असल्याने तिला खुलताबाद येथे दवाखान्यात उपचारासाठी घराला कुलूप लावून सर्व जण गेले उपचार करून परत घरी आले असता घराचे कुलूप तुटलेले दिसून आलेव कपटाला कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटात ठेवलेले वीस हजार रुपये व गावातील असलेल्या प्लांट चे कागदपत्रे चोरून नेलेइमादोदिन दर्ग्याचे उरूस जवळ आल्याने जमिल शाह यांनी वीस हजार रुपये कष्टाने जमा करून ठेवले होते त्यावर चोरट्यांनी डल्ला मारला जमिल हा अगदी गरीब असल्याने त्याचे कुटुंब हवालदिल झाले आहे जमिल यांच्या तक्रारी वरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आले आहे

## माळीवाडा येथील पोळा उत्साहात साजरा




**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा येथील मानाचा बैल पोळा शुक्रवारी गावातील वेशीत भरला परिसरातील सर्व शेतकरी बाधंव आपल्या बैल जोडी सजवून गावाच्या लक्ष्मीमाताची दर्शन करुन गावाच्या येशीत जमा होतात येशी मध्ये आब्याचा पाणाचे तोरण बाधुन मानाची पुजारी पुजा व नारळ फोटून पोळा फुटला येशीतुन बैल जोडीला वाजत गाजत येशीतुन मारुतीला प्रदर्शना घालुन बैल घरोघरी पुजा केली जाते.पुरण पोळीचा निवद दिला जातो. यावेळी सोमनाथ मुळे, दत्तु मुळे,नारायन मुळे, सुभाष मुळे,धनराज शेरकर,कृष्णा मुळे,प्रविन बर्डे,मनेश गाजरे शिवाजी मुळे,संदिप सिरसाठ,जगू गाजरे पोलिस पाटील प्रमोद साठे समस्थ गावकरी याची उपस्थिती होती.सहायक पोलिस उपनिरीक्षक रफीक पठाण,राजेंद्र सोनवणे, पोलीस पाटील प्रमोद साठे यांनी चोख बदोबस्त ठेवले होता.तसेच पोळाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी पाडव्याला निमित्त माता लक्ष्मीआईची नवसाच्या बारा बैलगाड्याची यात्रा भरते हि परंपरा 150वर्षा पासून चालू आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ ऑगस्ट २०२५


## राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार : बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचा पट्टा



**मुंबई :** मागील दोन दिवसांपासून राज्यात पावसाने उघडीप दिली असली तरी, आता पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांत अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

मागील आठवड्यात महाराष्ट्रात मुसळधार पावसाने थैमान घातले होते. १६ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट दरम्यान झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले होते. अतिवृष्टीमुळे शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिकांचे मोठे नुकसान झाले आणि शेतकरी हवालदिल झाले. दोन दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला असला, तरी धोका अजूनही टळलेला नाही. हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली असून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांत मुसळधार पाऊस झाला होता. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, जो राजस्थान आणि पंजाब परिसरात सक्रिय होईल. याचा परिणाम म्हणून २५ ते २८ ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्रात पावसाचा जोर पुन्हा वाढणार आहे. विशेषतः, मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडा या भागांत जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, पुढील पाच दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. पुढील २४ तासांत रायगड, सातारा, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यांसह घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता असून या भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करताना, पूरसदृश परिस्थिती किंवा भूस्खलनाचा धोका असलेल्या भागांत सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे.

## बौद्धगया महाविहार मुक्ती आंदोलनाची ऐतिहासिक धम्मध्वज यात्रा सोमवारी शहरात

**छत्रपति संभाजीनगर :** आज शहरात अखिल भारतीय भिक्खु संघाच्या वतीने बुद्धलेनी येथे जाहीर पत्रकार परीषद घेण्यात आली आहे. दि. २५/०८/२०२५ सोमवार रोजी शहरात येणाऱ्या बौद्धगया महाविहार मुक्ती आंदोलनाच्या भव्य धम्मध्वज यात्रेस क्रांतीचौक ते बुद्धलेणी या मार्गावर भव्य धम्मध्वज यात्रा निघणार आहे.अखिल भारतीय भिक्खु संघाच्या वतीने व आंबेडकरी पक्ष संघटनांच्या वतीने माहिती देण्यात की, बौद्धगया महाविहार मुक्तीसाठी कारावास भोगलेले क्रांतिकारी भंते विनाचार्य व भिक्खु संघाच्या वतीने दिक्षाभुमी ते चैत्यभुमी भव्य धम्मध्वज यात्रा संपूर्ण देशभर पुकारण्यात आली असून ही ऐतिहासिक धम्म ध्वज यात्रा आपल्या छत्रपती संभाजीनगर शहरात दि. २५/०८/२०२५ सोमवार रोजी वेळ सकाळी ११:३० वाजता पोहचणार आहे. व पुज्य भदन्त विशुध्दानंद बोधी महाथेरो यांच्या नेतृत्वात व भंन्ते विनाचार्य तसेच पुज्यनीय अखिल भारतीय भिक्खु संघ सर्व पक्षीय आंबेडकरी पक्ष संघटना व हजारो बौद्ध उपासक उपासिका यांच्या उपस्थितीत क्रांतीचौकातून पैठण गेट गुलमंडी औरंगपूरा माहत्मा फुले स्मारक मार्ग खडकेश्वर, मिलकॉर्नर, मिलिंद कॉलेज आणि विद्यापीठ गेट येथे अभिवादन करून धम्म भूमी बुध्दलेणी येथे पोहचणार आहे. व या ठिकाणी पुज्यनीय भिक्खु संघाच्या उपस्थितीत विराट धम्म सभेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हजारो बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित राहणार आहेत.तरी वरील शांतवेच्या मार्गाने निधणाऱ्या धम्ममय भव्य धम्म ध्वज यात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय भिक्खु संघ, सर्व पक्षिय आंबेडकरवादी पक्ष संघटना व आंबेडकरवादी बहुजन विकास समितीच्या वतीने करण्यात आले आहे.या पत्रकार परीषदेस भंते विशुद्धानंद बोधी महायथेरो,भंते संघप्रिय,भंते बोधीधम्मो,दिपक निकाळजे,प्रांतोष वाघमारे,अमित वाहुळ, कपिल बनकर, विष्णु जगताप अरविंद कांबळे मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते..

## मनोज जरांगेंना आरक्षणातील किती कळते? - लक्ष्मण हाकेंचा सवाल





मराठा आंदोलन मनोज जरांगे आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलन करणार आहेत. त्यासाठी ते २९ ऑगस्टपासून मोर्चा घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. जरांगे यांना आरक्षणाबद्दल काहीच माहिती नाही, अशी टीका करत लक्ष्मण हाकेंनी जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या भूमिकेवर आक्षेप घेतला आहे. तसेच मनोज जरांगेंना अनेक प्रश्न विचारले. शिवाय काही दिवसांपूर्वी व्हायरल झालेल्या त्यांच्या व्हिडिओवरही त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी आरक्षण बचावासाठी आज बीडमध्ये बैठक घेतली. या दोघांमधील वादानंतर त्यांची पहिलीच बैठक बीडमध्ये होत होती. या बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगेंवर टीका केली.

लक्ष्मण हाके म्हणाले, आरक्षणाच्या लढायची पुढील दिशा आणि स्वरूप ठरवण्यासाठी आजची बैठक असल्याचे हाके म्हणाले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये आम्ही बैठक घेत आहोत. ओबीसींची संघर्ष यात्रा निश्चित काढली जाणार आहे. लवकरच याबाबतचा निर्णय जाहीर केला जाणार आहे. कोणीतरी मुंबईला जात आहे आणि यंत्रणा वेठीस धरत आहे. मात्र आम्ही तसे करणार नाही.

यावेळी बोलताना लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगेंवरही निशाणा साधला. मनोज जरांगेंना आरक्षणातील किती कळते? असा सवाल करत, आरक्षणाचे अधिकार आयोगांना असतात. ज्या जातींचा ओबीसीत समावेश केला जातोय. त्या ओबीसीतील उपजाती आहेत, असे हाके म्हणाले. ओबीसीत नव्याने जाती सामील केल्या आहेत, असे काही नाही. मनोज जरांगे यांना यातील कळत नाही. ज्यांना कळते त्यांनी पुढे यावे. आरक्षण कुणालाही दिले जाते नाही. जी जात मागे पडते तिला पुढे आणण्यासाठी आरक्षण दिले जाते, त्यात तुम्ही बसतच नाहीत, असेही हाके म्हणाले.

मुंबईतील कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला. तुम्ही मंत्र्यांना अंतरवालीत बोलून घ्या. मुंबईत दंगली घडवायला चालले आहात का? असा सवाल हाकेंनी मनोज जरांगेंना केला. मुख्यमंत्र्यांना टार्गेट करणे हा त्यांचा अजेंडा आहे. जे घडत आहे. ते बेकायदा घडत आहे. सर्वोच्च न्यायालयाने जो निवाडा दिला त्याच उल्लंघन तुम्ही करत असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगेंवर केली.

आत्तापर्यंत वाटप झालेले कुणबी प्रमाणपत्र बोगस आणि बेकायदा असल्याचा दावा लक्ष्मण हाके यांनी केला. कुणबी नोंदी आढळल्या म्हणून तुम्ही मागास कसे? असा सवालही हाकेंनी जरांगेंना केला. कुणबीचा आधार घेऊन कोणीही घुसखोरी करत असेल, तर हा ओबीसीचे आरक्षण संपण्याचा प्रकार आहे. आता लढत ओबीसी विरुद्ध कुणबी अशी होणार नाही. तर बोगस कुणबी विरुद्ध कुणबी अशी होणार आहे, असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २४ ऑगस्ट २०२५

# समृध्द मनाचा संवाद सेतू:-भयातून निर्भयाकडे




लेखिका डॉ सुनीता चव्हाण यांचे वैद्यकीय पेशातले, ललितगद्य कथात्म मानसंवैद्य समृद्ध चिंतन चिकित्सक अभ्यासक आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक,अनुभव म्हणजे भयातून निर्भयाकडे हा एक समृद्ध अनुभवाचा संवाद सेतू आहे .मुळत: लेखिका,मानस उपचारतज्ञ,वैद्यकीय समुपदेशक मानसशास्त्र अभ्यासक असल्याने मानसं विकार ही सारे मन भावनेशी निगडित आहे.माणसाच्या आत्मानुभूतीतून जे काही चांगले वाईट अनुभव असतात.त्याचे मानवी मनावर साद पडसाद उमटले जातात तेंव्हा भारतीय परंपरेचा पगडा मानवी मनावर खोलवर रुतलेला आहे.मंगळ, बुद् गुरू, शुक्र शनी या ग्रह ताऱ्यांच्या मनोभावनेशी जोडला जाऊन मानवाचे मनाचे विकार लेखिका डॉ सुनीता चव्हाण अतिशय मनोज्ञ भावनेतून कथात्म संवाद ललित लेखनातून अतिशय ज्ञानसंवेद वृध्दक भाषेतून वाचकाभिमुख झाल्याने सहावी आवृत्ती निघाली आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे.कविताहा वाड्मय प्रकार जसा भावनेशी निगडीत आहे.तसा मानसं विकार हा मनभावनेशी अनुबंधित असल्याने एक कवयित्री या भावबंधनातून रोजमर्राच्या जगण्यात जे पेशंट येतं होते.त्याच्या मानसिक ताण तनावाचे जगणे आणि यातून एक नवा दृष्टीकोन देणारे हे पुस्तक म्हणजे मनाचा एक संवाद सेतू.. भयातून निर्भयाकडे.या कलात्मक ललित गद्याला कवीवर्य सतिश सोळांकुरकर यांच्या शब्दांनी काव्यभावनेतून लिहितात,"हा एक समृद्ध मनमुग्ध मनस्वी संवाद सेतू झाला आहे.हे पुस्तक म्हणजे प्रत्येकाने वाचलेच पाहिजे.कारण या हळव्या मनाला,मनमस्तिक,मनाला बळकटी देणारं हे पुस्तक आहे. डॉ सुनीता चव्हाण मुळात एक सृजनशील कवयित्री आहेत म्हणून मानवी मनाचा अंथाग ठाव घेण्यात या ललित गद्यमनोमग्ध कथात्म मानसं संवाद मनोवेधक झाला आहे".तर ख्यातनाम कवी अशोक बागवे सर लिहिता"स्त्री ही अंनत दु:ख वेदनेची कळ सोशिक होऊन सहनशीलतेला फांद्या फुटाव्यात आणि त्याही दु:ख फळांनी लगडून याव्यात इतके अद्वैत दु:ख सहन करण्याची ताकद फक्त मातेत असते.जी बाळ यातना सहन करून या निर्मिकाला ही आव्हान देते..'मीच आहे ती या जीवाला जन्म दिला'.."संवेदनेचा संवाद सेतू असा की स्त्री जेवढी मनात बोलते,तेवढी ती जनात बोलत नाही. दु:ख बोलके असते.वेदना नि:शब्द असते.वेदनेचा सल हा निश्चल असतो.दु:खातून आक्रोश बाहेर पडतो.तर वेदनेतून संवेदना जागृत होते.म्हणून भारतीय स्त्री आपल्या वेदना सहन करीत आली आहे.या वेदनेच्या सहनशक्तीला 'तितीक्षा'असे म्हणतात.करुणेचे महादालन स्त्रीच्या अंत:करणात असते."हे काव्यमय वास्तव चिंतन कवीने मांडले आहे.तद्वत्वच ज्योतिषाचार्य प्रा.रत्नदिप कर्णिक यांचे मत असे की"समाजभान व समाजस्वास्थ्य पाहणाऱ्याला डॉ सुनीता चव्हाण यांनी समाजात जे समज गैरसमज,अज्ञानाला,भयाला ज्ञान निर्भयतेकडे नेणारे हे पुस्तक.जणू मनमस्तिक घडवते." या ग्रंथाचे वाड्मयीन मूल्यांची ललित गद्यता असल्याने वाचनाभिमुक्तता सुलभ झाली आहे.कुठेही अवजड बोजड शब्दकळा नाही.मनावी मनाचे भयाचे निर्दलन करुन जनमानसाचे मन संवाद सेतूने निर्णयाकडे घेऊन जाते.म्हणजे आजच्या प्रचंड झगमगाटी कल्लोळ कोलाहत माणूस आनंद हरवून बसला आहे.तान तनाव आणि क्षणिक सुखाची लालसा वप्रचंड व्यसनाधीनता, चंगळवाद, आणि सामाजिक समाजभान हरपत चाललेला सर्वव्यापक चिंतेत असलेला समाज.कवयित्री डॉ सुनीता चव्हाण यांनी जे मानसशास्त्रीय अध्याय अध्यापन केले त्याचा शाश्वत वैद्यकीय समुपदेशक परिपाक म्हणजे "भयातून निर्भयाकडे"यातील चिंतन आशय संपन्न कथात्म प्रकरणे'मेनोपोज मधील संभ्रमता, स्तनकॅन्सरचीजागरूकता,मनाचे दुभंगलेपण, मासिक पाळी एक वरदान,अग्नीपरिक्षा स्त्रीत्वाची, हस्तमैथुन:-एक समस्या, बाळंतपण:- आज कालचे,मुलांची स्फोटक वृती, स्पर्श चांगला/ वाईट, आधी संस्कार मग साधने,भयाचा डोह, अभ्यासाचा गुंता आणि पालक,काळ आला होता, किडणी एक दुर्लक्षित अवयव,नको ती वजन वाढ, देहदान: उत्कृष्ट आविष्कार!, व्यायाम मनाचा,...एक खंत, चांगल्या सुनेची चांगली सासू: दुर्मिळ किताब!लाॅकडाऊन आणि कोविड कथा. ही ललितकथात्म कथासार पाहिला की, वैद्यकीय ज्ञान साधक साध्यतेने मानवी मनाच्या खोलवर जाऊन या भयाकडे लेखिकेने आपले मनोज्ञ चिंतन दर्शन घडविले आहे.मानवी मनाची संभ्रम अवस्था झाली की,त्याला चकवा लागला.पण हे सारे भ्रमण आहे.या चकव्यालाच लेखिकेने चांदणं कस्तुरीचा आत्मविश्वास निर्माण केला आहे.कर्करोग म्हणजे मरण पण जर योग्य मनोभाव ठेवून शरीर साधनेकडे लक्ष दिले तर यावर ही विजय मिळवता येतो.स्तनकॅसर विषयी समुपदेशन यात आहे.जे भयाकडून निर्भयाकडे घेऊन जाते.आजच्या उच्च विभूषित कुटूंबात मुलं रागीट,क्रूर भयानक वृतीप्रवृतीचे होतं चालले आहेत.काही मनोरुग्ण होतं आहेत.यात मानसशास्त्रीय समुपदेशने या भयातून ते सावरते.भयाचा डोह यात खरोखरच आपण कोसो मैल दूर असूनही कुणीच कुणाच्या जवळ नाही.एका घरात असूनही सुसंवादी नाही.नाते गोते जिव्हाळा आपुलकी नम्रता या गोष्टी दुय्यम दुराग्रही दुरापास्त होतं चालल्या आहेत.या नात्याची खंत इथं भयाचा डोह देऊन जाते.मनाचे दुभंगले पण केंव्हा येते? माणूस म्हणून जन्माला आला.तुझ्या देहाच्या देव्हाऱ्यात तेवणार श्वास संपला की तू मातीमोल झाला.अशा दुभंगल्या मनाला मनाच्या अंतरंगी फांदीवर जाऊन लेखिका मानस उपदेशन करून त्याच्या मनाचं कैवल्य वाढवते.त्याचे भान त्याला दिले की, 'तूझं आहे तूझ पाशी,या उक्ती प्रमाणे किंवा 'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण',या भारतीयांची शिक्षण विषयक भावना किती पवित्र व पाक होती.आज पालक बालकं आणि अभ्यास.यावर ही अतिशय लक्षवेधी मनोव्यथा लेखिकेने मांडल्या आहेत.यात स्पर्धेचा महाभयंकर जडलेला मनोरोग आणि वसा वारसा हक्क यांची कुत्रं ओढ थांबवली की,या आत्महत्या थांबतील.मानस उपचारांनेयोग साधनेने या दिशा गवसतील.हे मानसशास्त्रीय बोधात्मक समुपदेशन करणारे शिद्हस्त पुस्तक ठरले आहे.मनाचा व्यायाम करणे म्हणजे मन मस्तिष्क, मनगटाची दणकटता निर्माण करणे.वजन वाढते आहे.कारण आपला आहार विहार या परिवलाचे वर्तूळ बदलले आहे.तरीही 'मन काबूत तर सारे शाबूत' या युक्ती प्रमाणे चालणे थांबले आहे.श्रम कमी झाले आहे.उधाण कॅलरीज वाढल्याने हा रोगच झाला आहे.या वरचे समुपदेशन मर्मग्राही झाले आहे.या समकालीन वास्तवाचे चटके सखेद आहेत.यावर 'स्पर्श चांगला वाईट, तसेच हस्तमैथुन,या विषयी वैद्यकीय समाजभान लेखिकेने बिनधास्त बीन्नदिक्त दिले आहे.स्त्रीजीवन जाणिवांची जडण घडण घडताना एक अमोघ शक्तीचा अद्वैत अनुबंध म्हणजे मासिक पाळी या विषयीचे समज गैरसमज अज्ञानाचा अंधकार या लेखातनातून उजागर करतांना खरच स्त्रीमातेचं दु:ख अगाध आहे.म्हणून ती अनंत जन्माची माता आहे.प्रत्येक महिन्याच्या पाळीला तिच्या नव्या रुपाचा जन्म होतं असतो.ती पवित्र मांगल्य निर्माण करणारी माता असते.इथं मानसशास्त्रीय मनोविज्ञान व स्त्रीदेहाच्या मिमांसा लेखिकेने केल्या आहेत.विज्ञान तंत्रज्ञानाची भाषा लेखिकेने वापरल्याने हे लेखन वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे स्मार्टफेसबुक झाले आहे.एखादा पेशंट जातो, तेंव्हा त्याचे नातेवाईक, डॉ.लेखिकेकडे जी काही नजरेने पाहते जणू तिचा बाप माझ्यामुळेच गेला.हा अनुभव लेखिकेने अत्यंत तरल सुक्ष्म भावानेतून व्यक्त केला आहे.इथे या सृजनशील वाड्मयीन अधिष्ठान लेखनाला प्राप्त होते.सासू सारख्या सुचना करणारी तर सून सासूच्या सारख्या सुचना नाकारणारी.या नात्याची गुंफण लेखिकेने मानसं भावनेतून कथात्म स्वरूपात इतकी सशक्ततेने मांडली आहे की, कोणत्याही स्त्री सुलभ भावनेचा आविष्कार अलगदपणे मैत्रीमध्ये साकार केला तर हे नाते गोते न होता सुमधुर सूताचे होते.हा मनस्वी मंत्र इथे लेखिकेने दिले आहे.कोविड काळातील काळाकभिन्न अनुभव डॉ.असून ही जी वेदना लेखिकेला सहन करावी लागली.वैद्यकिय सेवा मनात पासून करायची आहे. "होमक्वारंटाइन झाल्याने पेशन्ट फोन करून विचारपूस करायाचे"हा काळजाला भिडणारा अनुभव लेखिकेने मांडला आहे.हे मानवी मनाचे आत्मिक जिव्हाळाचे नाते या भयातून निर्भयाकडे जाताना मनमुग्ध मनस्वी संवाद सेतू होऊन जाते.पाठराखण पद्मश्री डॉ तात्याराव लहाने लिहितात,"पालक,मुले, आणि अभ्यासक यांची मानसिकता यांच्यातील प्रत्येक गोष्टीचा विचार मुंलाची स्फोटक वृती, अभ्यासाचा गुंता, भयाचा डोह, यामध्ये पालक आणि मुलांच्या संवादाचे महत्त्व सांगून त्यांच्यामध्यील बुजरेपणाचा पडदा बाजूला करून एक मैत्रीचे नाते निर्माण केलं आहे..आधी संस्कार मग साधने..या लेखात डॉ.पालकाचे कान पकडले आहे...हे पुस्तक पालक मुले, स्त्रिया या सर्वांसाठी लिहिले आहे"असा निर्लेप नितळ श्रेध्दय विचार या ग्रंथाची गौरवांकित पाठराखण आहे.मुखपृष्ठ संतोष धोंगडे यांच्या अर्थ वलयांकित म्हणजे आजची निर्भया भयातून मुक्त होते आहे.मनाचा मुक्त व्यक्त सुसंवाद सेतू बांधतते आहे.कवयित्री, सिद्धहस्त लेखिका डॉ सुनीता चव्हाण यांना पुढील लेखानास हार्दिक शुभेच्छा.

**भयातून निर्भयाकडे कडे... संवाद सेतू***
**लेखिका:- डॉ सुनीता चव्हाण**
***प्रकाशक:-डिंपल पब्लिकेशन, बोरिवली, मुंबई**
***सहावी आवृत्ती:- ८मार्च २०२३**
***किंमत:-२५०**
***पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002